# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - ०३/०४/२०१९

**<u>वानवडी पोलीसांनी ४८ तासात परराज्यातुन खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस केले जेरबंद</u>**

दिनांक ०१/०४/२०१९ रोजी वानवडी पोलीस ठाणेस खुनाचा गुन्हा घडला असुन त्याचा गुन्हा रजि.नंबर २१९/२०१९ भा.दं.वि.कलम ३०२ असा आहे. दाखल गुन्ह्यातील आरोपी हा परराज्यात निघुन गेल्याचे वानवडी पोलीस ठाणेकडील पो.ना.संतोष राठोड यांना त्यांचे बातमीदाराने कळविल्याने त्याबाबत त्यांनी वरिष्ठांना कळवुन वरिष्ठांनी ताबडतोब तपासाची सुत्रे हालवीली व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक, दत्ताजीराव मोहीते, त्यांचेसोबत पो.ना.संतोष राठोड, पो.शि. शिरीष गोसावी, पो.शि.प्रतिक लाहीगुडे यांची एक टिम तयार करुन सदर आरोपीच्या शोधात कर्नाळ तांडा कर्नाटक येथे रवाना केली.

सदर टिमने कर्नाटक राज्यात जावुन कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी नामे श्रीकांत कमाल चव्हाण वय २७ वर्षे रा.मु.कर्नाळ, पो.खानापुर, ता.सिंदगी, जि.विजापुर, राज्य कर्नाटक यास ताब्यात घेवुन वानवडी पोलीस ठाणे येथे आणुन त्यास दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री भगवान कांबळे, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, पुणे शहर, श्री प्रकाश गायकवाड सो, पोलीस उप-आयुक्त परिमडळ-५, पुणे शहर, श्री प्रभाकर ढमाले सहा. पोलीस आयुक्त वाहतुक विभाग, पुणे शहर (अतिरिक्त कार्यभार सहा.पो.आयुक्त वानवडी विभाग), श्री सुनिल भोसले, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री रावसाहेब भापकर, पोलिस निरिक्षक (गुन्हे), वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक श्री दत्ताजीराव मोहिते, पो.ना.संतोष राठोड, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.प्रतिक लाहिगुडे, यांचे पथकाने केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरिक्षक
वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर